# निरोगी उद्योग : बलशाली राष्ट्राची खरी संपत्ती

- डॉ. चंद्रकान्त शंकर कुलकर्णी
drcsk1950@gmail.com



आजारी उद्योग तथा कारखाने म्हणजे देशाच्या एकूण उत्पादनावर, आर्थिक उलाढालीवर होणारा दुष्परिणाम, कामगार-कर्मचाऱ्यांची विपन्नावस्था. राष्ट्र निरोगी आहे का नाही हे त्या देशातील आजारी उद्योग किती यावरून ठरते. विशेषत: वाढत्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उद्योग आजारी न राहतील हे पाहणेसुध्दा प्रत्येक उद्योजकाची, उद्योगातील व्यवस्थापनाची, कर्मचाऱ्यांची तसेच शासकीय यंत्रणेचीसुध्दा जबाबदारी आहे; कारण आजचे 'निरोगी उद्योग' हीच उद्याच्या बलवान राष्ट्राची खरी संपत्ती आहे.

इंग्रजीमध्ये 'प्रिव्हेंशन इज बेटर दॅन क्युअर' अशी एक म्हण आहे. आजारी पडल्यावर उपाययोजना करण्यापेक्षा आजारीच पडू नये याची खबरदारी घ्यायला हवी. एखादा व्यवसाय, उद्योग आजारी पडणे म्हणजे तेथील मालक किंवा व्यवस्थापन आजारी आहे असे म्हणायला हरकत नाही. व्यापार किंवा कोणताही उद्योग कधीही आजारी होवू शकत नाही, तर ती संस्था/कंपनी, चालवणारी मालक मंडळी, तेथील व्यवस्थापन आपल्या चुकीच्या व्यवस्थापनामुळे कर्जबाजारी होतात व आपला उद्योग आजारी म्हणून जाहीर करतात.

एखादी व्यक्ती आजारी पडली की तिचे दैनंदिन व्यवहार थंडावतात. आंथरूण धरावे लागते, वैद्यकीय उपचारावर खर्च करावा लागतो. यातून ती एकतर पूर्वपदावर येते वा प्रसंगी दगावते. उद्योगाच्या बाबतीत असेच होत असते. निरोगी उद्योगात सर्व व्यवहार सुरळीत चालू असतात. उत्पादन व विक्री, त्यातून अर्थार्जन व कामगार-कर्मचाऱ्यांचे कल्याण होत असते.

उद्योग आजारी पडला की, मालाचे उत्पादन अनियमित होते, पैशाची आवक थंडावते, वित्तीय सहाय्य करणाऱ्या संस्थांकडून मिळणारे अर्थसहाय्य आखडले जाते. कामगारांचे पगार थकतात. इतर देय रकमादेखील भागविणे कठीण जाते. उद्योगाच्या क्षमतेबद्दल जनमानसात शंका निर्माण होतात. उद्योगाच्या विश्वासाहर्तेला धोका पोहचू शकतो. परिणामी याची झळ कामगार-कर्मचारी, माल विक्रेते, विविध माल पुरविणाऱ्या कंपन्या, ग्राहक या सर्वांना सोसावी लागते. उद्योग जेवढा मोठा तेवढे हे परिणाम व्यापक व जेवढ्या लहान तेवढी व्याप्ती मर्यादित असते.

शासनाचे व बँकांचे धोरण : सर्वसाधारणपणे कोणताही उद्योग बंद पडणार नाही असे शासनाचे धोरण असते. तसेच बँकाही अशा वेळी विविध नियंत्रणातून उद्योग कसा सावरेल हे पाहण्यासाठी धडपडत असतात. कारण आजारी उद्योगामुळे आर्थिक नुकसान, रोजगार उपलब्धतेवर परिणाम, देशाची एकूण उत्पादन क्षमता यावर परिणाम होतो. यामुळे कित्येक उद्योग सावरल्याची उदाहरणे आहेत. आजतागायत अनेक कापड गिरण्या आजारी आहेत. तसेच अलिकडेच महाराष्ट्रातील काही प्रसिध्द उद्योग बंद पडलेले आपण वाचले असेल. अलिकडे उपलब्ध आकडेवारीनुसार देशातील लघुउद्योग क्षेत्रातील २ लाख २१ हजार आजारी उद्योगांपैकी केवळ १६ हजार पूर्वपदावर येवू शकणार होते, तर २ लाखांवर हे त्यापलिकडे गेलेले होते. मोठ्या उद्योगातील २ हजार ३३७ आजारी उद्योगांपैकी ९०० उद्योग सावरले जावू शकले, तर बाकीचे १ हजार ४९० बंद पडण्याच्या मार्गावर होते. या सर्वातून निर्माण होणारी बेरोजगारी, आर्थिक नुकसान त्या व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या नागरिकांची होणारी कुचंबणा किती असेल याचा विचार केला तर या प्रश्नांची व्याप्ती लक्षात येईल. अशा या उद्योगाच्या आजारी पडण्यामागची कारणे प्रामुख्याने खालील प्रमाणे असतात.

उद्योगाचे स्वरूप : भागीदारी, प्रोप्रायटरी, प्रायव्हेट लिमिटेड व लिमिटेड या पैकी, आपला व्यवसाय कोणत्या स्वरुपाचा आहे व त्याची

व्याप्ती किती आहे यावर अवलंबून राहील. तथापि, व्यवस्थापनातील आवश्यक सोपस्कार व त्यावरील खर्च यातील वेळ व पैशाच्या अपव्ययामुळे आर्थिक नुकसान पोहचू शकते. तात्पुरत्या फायद्यासाठी वा मैत्रीच्या प्रेमाखातर केलेले भागीदारीतले उद्योग नफा या जबाबदारीच्या वाटणीतील तंट्यामुळे आजारी पडतात. कित्येकदा शासकीय नियमात अडकतात व यासाठी उद्योगाचे स्वरूप उद्योगाला पूरक व साजेसे असावे लागते.

**उत्पादन:** आपले उत्पादन काय आहे? त्याची बाजारपेठ कोणती? स्पर्धक कोण व कुठे आहेत? मागणी तात्पुरती आहे की दीर्घकालीन याचा विचार न करता उत्पादन चालू ठेवल्यास मागणीतील खंड, तीव्र स्पर्धा वगैरेमुळे उद्योग आजारी पडण्यास सुरवात होते.

**भांडवल:** उद्योगातील एकूण भांडवल गुंतवणूक किती? त्यात आपले किती? वित्तीय संस्थांचे किती? भागधारक असल्यास त्यांचे किती? विक्रीतून येणारा पैसा कधी येणार? या गोष्टींचा विचार केला नाही तर कर्जाचे ओझे वाढत जाते. पैशाचा पुरवठा अपुरा पडू लागतो, इकडे खर्च तर वाढत जातोच, मुद्दल व व्याजाच्या परतफेडींचे तगादे वाढत जातात व आजाराची लक्षणे दिसू लागतात.

**आधुनिकीकरणाचा अभाव:** उत्पादन, उत्पादनातील वेगवेगळे संशोधन, विक्री व्यवस्था, जाहिरात वगैरेत आधुनिकीकरण व कालानुरूप बदल करत न गेल्यास स्पर्धेत टिकाव धरणे कठीण जाते. उत्पादन खर्च वाढतो. उद्योगातील जुनाट वातावरणाचा कार्यक्षमतेवर परिणाम होतो; परिणामी ग्राहक दुरावून उद्योग आजारी पडतो.

**विक्री व्यवस्थेकडे दुर्लक्ष:** विक्रेते, उपविक्रेते, एजंट हे उद्योगातील महत्त्वाचे घटक असतात. त्यांना मिळणारे पैसे हे नफ्यातून जात नाहीत, तर ते मालाच्या किंमतीचाच एक भाग असतात. परंतु बऱ्याच उद्योजकांचा असा ग्रह असतो की एजंटाना मिळणारे पैसे हे आपल्या नफ्यातून जात आहेत, म्हणून ते एजंट नेमत नाहीत. परिणामी हे सर्व घटक स्पर्धकांचा माल विकण्याकडे वळतात व विक्रीवर परिणाम होतो.

**पैसा इतरत्र वळविणे:** व्यवहारातून हाती येणारा सर्व पैसा म्हणजे नफा नव्हे. कच्चा माल, त्यावरील प्रक्रिया, संशोधन, व्यवस्थापन व विक्रीवरील खर्च (एजंट, विक्रेते यांचे कमीशन) हे सर्व खर्च गेल्यानंतर उरलेले पैसे म्हणजे नफा हे लक्षात न घेता अनुत्पादक गोष्टींवर खर्च केला जातो. वाहन खरेदी, खाजगी कारणासाठी उद्योगातील पैसा वापरणे, लग्नसमारंभाप्रसंगी उद्योगातील पैसा खर्च करणे, यामुळे उद्योगातील पैसा कमी पडतो. खेळते भांडवल कमी पडून आजाराची लक्षणे दिसू लागतात.

**कर नियोजनाचा अभाव :** अनेक उद्योगात कर नियोजन केले जात नाही. कर चुकविल्याने पैसा वाचतो अशी त्यांची भ्रामक कल्पना असते. प्रत्यक्षात कराचे ओझे एकदम वाढले की आर्थिक अडचण निर्माण होते. कर सल्लागाराच्या नेमणूकीचा खर्च काटकसर म्हणून कमी केला जातो. तसेच योग्य त्या दर्जाचे कर्मचारी न नेमल्याने त्यावर होणाऱ्या खर्चापेक्षा भरमसाठ अधिक खर्चाचा बोजा पडू शकतो.

**दर्जाकडे दुर्लक्ष:** आपल्या उत्पादनाचा, विक्रीचा व विक्रीपश्चात सेवेचा दर्जा जर चांगला नसेल तर आपले ग्राहकच आपले शत्रू बनतात. चांगल्या दर्जाम ुळे ते चारचौघात न कळत आपल्या विक्रेत्यांचे काम करत असतात. दर्जा वाढविण्यात होणारा खर्च हा उद्योगाचाच एक भाग मानला तर हा खर्च अनावश्यक वाटणार नाही. उद्योग आजारी पडण्यामागे दर्जाकडे दुर्लक्ष हे प्रमुख कारण असू शकते.

**स्पर्धकांचे योग्य मोजमाप:** आपल्या व्यवसायातील स्पर्धक कोण? त्यांच्या व आपल्या उत्पादनातील बरे वाईट काय व त्याची माहिति आपणास व आपल्या ग्राहकांना आहे का नाही? याची अद्ययावत माहिती नसली तर आपल्या उद्योगास आजारी पडायला आपले स्पर्धकही कारणीभूत होतात.



**जनसंपर्काकडे दुर्लक्ष:** आपले ग्राहक, वीज पुरवठा करणारे कर्मचारी, कच्चा माल व यंत्रसामुग्री पुरविणारे कर्मचारी, विक्रेते, शासकीय अधिकारी व हितचिंतक हे सर्व घटक उद्योगाचाच एक भाग अ सतात. त्यांच्याशी संबंध उत्तम ठेवणे, लोकसंग्रह वाढविणे, जनसंपर्क ठेवणे, मान्यताप्राप्त सेवाभावी संस्थाद्वारा चारचौघात मिसळणे या सर्वांतून उद्योग वाढण्यास मदत होते.

**संप, टाळेबंदी वा तंटे :** उद्योगातील कामगारांच्या संघटनाबरोबर पगारवाढ, बोनस व अन्य मागण्यामुळे होणारे विवाद यातून प्रसंगी संप, टाळेबंदी, गो–स्लो, लवादांच्या निर्णयातील विलंब, यामुळेही उत्पादन, अर्थार्जन व त्यातून होणारा विनिमय यावर परिणाम होवून उद्योग आजारी पडू लागतो. अशा आजारी पडलेल्या उद्योगाच्या प्रतिष्ठेला धोकाही पोहोचण्याची शक्यता असते.

उपरोक्त सर्वच बाबी सर्व उद्योगसमूहांना कमी जास्त प्रमाणात लागू पडतातच. तथापि, बऱ्याचशा प्रमाणात उद्योगाचे स्वरूप व व्याप्ती यावर त्या अवलंबून असतात. आजार झाल्यावर त्यावरच्या औषधोपचारावर खर्च करण्यापेक्षा आजार होणारच नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

आजारी उद्योग म्हणजे पर्यायाने देशाच्या एकूण उत्पादनावर आर्थिक उलाढालीवर होणारा दुष्परिणाम, कामगार–कर्मचाऱ्यांची विपन्नावस्था. राष्ट्र निरोगी आहे का नाही, हे त्या देशातील आजारी उद्योग किती यावरून ठरते. विशेषत: वाढत्या आंतरराष्ट्रीय स्पर्धे त, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उद्योग आजारी न राहतील हे पाहणेसुध्दा प्रत्येक उद्योजकाची, उद्योगातील व्यवस्थापनाची, कामगार–कर्मचाऱ्यांची तसेच शासकीय यंत्रणेचीसुध्दा जबाबदारी ठरते. काम करत असताना, हा उद्योग माझा आहे, माझे आणि माझ्या कुटुंबियांचे आयुष्य याच्यावर अवलंबून आहे. हा विचार त्या उद्योगावर अवलंबून असणाऱ्या सर्वांनी करणे अत्यंत गरजेचे आहे, आणि जर असे केले तरच उद्योग निरोगी राहतील, उद्योग आजारी पडणार नाहीत व परिणामी सर्वांचेच कल्याण होईल; कारण निरोगी उद्योग हीच खरी बलवान राष्ट्राची संपत्ती आहे.